ePaper

‘वायझेड’वरुन दोघांत जुंपली, मिटकरी-हाकेंची एकमेकांवर टोकाची टीका

वर्ष - 8 । अंक - 297 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

आतील पानांत

- जितेशचा ‘लगान’ स्टाईल भन्नाट शॉट!
- अय्यरमुळे शुबमन गिलवर दबाव येतोय
- आसाममध्ये काँग्रेस नेतृत्वात बदल
- एलॉन मस्क यांचे वडील भारत दौऱ्यावर

www.mahaenews.com | बुधवार , दि. 4 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

विराट कोहलीने 18 वर्षे उराशी बाळगलेले स्वप्न साकार ! अहमदाबादमध्ये ‘विराट’ जल्लोष !!

‘RCB’ ठरले चॅम्पियन्स!

श्रेयस अय्यर बाद झाल्यानंतर ‘पंजाब किंग्ज’ ने हाराकिरी पत्करली ; सहा धावांनी पराभूत !

। नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद । प्रतिनिधी । महाईन्यूज

‘आयपीएल २०२५’ चा अंतिम सामना रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु (RCB) आणि पंजाब किंग्जमध्ये रंगला. भारताचा स्टार खेळाडू विराट कोहली याने तब्बल १८ वर्षे उराशी बाळगलेले अजिंक्यपदाचे स्वप्न साकार झाले. RCB ने प्रथमच या चषकावर आपले नाव कोरले असून संघाने आपल्या लाडक्या खेळाडूला विराट गिफ्ट दिले आहे. तुफान फॉर्ममध्ये असलेला श्रेयस अय्यर आणि त्याचा पंजाबचा संघ मात्र कमनशिबी ठरला. वेगवेगळ्या संघाकडून खेळताना श्रेयस अय्यरने चौथ्या वेळा आपला संघ अंतिम फेरीत आणला होता, पण यावेळीही दुर्दैवाने त्याला सोडले नाही.

नाणेफेक जिंकली, पण हाराकिरी..

या अंतिम सामन्यात नाणेफेक पंजाबने जिंकली आणि श्रेयस अय्यरने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना आरसीबीने १९० धावा केल्या आणि पंजाबला १९१ धावांचे ‘लक्ष्य’ दिले, पण ते त्यांना पेलवले नाही.

विराटने 18 स्पर्धा वाट पाहिली

‘आरसीबी’ चे जेतेपदाचे स्वप्न पूर्ण झाल्यानंतर विराट कोहलीला अश्रू अनावर झाले. पण त्यापूर्वी या संपूर्ण स्पर्धेत ‘आरसीबी’ ने अप्रतिम कामगिरीचे दर्शन घडवले. या सामन्यात पंजाब किंग्सला सहा धावांनी पराभूत करत त्यांनी चॅम्पियनशिप वर नाव कोरले. तब्बल १७ वर्षांनी म्हणजेच १८ व्या पर्वात विराट कोहलीच्या संघाला जेतेपद मिळवण्यात यश आले आहे.

शेवटचे षटक तणावाचे

या १७ वर्षात तीनदा जेतेपदाची संधी आली होती. पण, तिन्ही वेळेस पराभवाचे तोंड पाहावे लागले होते. शेवटच्या षटकात पंजाब किंग्सला विजयासाठी २९ धावांची गरज होती. विराट कोहलीसह संपूर्ण संघ तणावात होता. शेवटचे षटक टाकण्यासाठी जोश हेझलवूड मैदानात आला होता. त्याने पहिले दोन चेंडू निर्धाव टाकल्यानंतर विराट कोहलीला विजयाचा विश्वास झाला. सीमेवर क्षेत्ररक्षण करताना त्याचे डोळ्यातून अश्रू आपसूक बाहेर निघाले. गेली १७ वर्षे ज्या गोष्टीची वाट पाहात होता, ते स्वप्न पूर्ण होताना पाहून विराट कोहलीला अश्रू अनावर झाले. प्रत्येक चेंडूनंतर विजय पक्का होत होता आणि विराट कोहली भावूक होत होता. त्याच्याबरोबर त्याचे लाखो चाहते ही नकळत अश्रूंना वाट करून देत होते.

माझ्या संघाला सर्वस्व दिले : विराट

जिंकल्यानंतर विराट कोहली म्हणाला की, हा विजय चाहत्यांसाठी जितका आहे तितकाच तो संघासाठी आहे. मी या संघाला माझे तारुण्य, शौर्य आणि अनुभव दिला आहे. (पान 8 वर)

ई साला कप नामदे !

या वर्षी आयपीएलची ट्रॉपी आमचीच असं अभिनेत्री रश्मिका मंदानाने म्हटलं होतं आणि बंगळुरूला पाठिंबा दिला होता. त्यानंतर तिचा हाच डॉयलॉग प्रत्येक आयपीएलमध्ये व्हायरल होत होता. यंदाच्या आयपीएलमध्येही हा डॉयलॉग बंगळुरूच्या प्रत्येक फॅनच्या तोंडी होता. गेल्या १८ वर्षांपासून आयपीएलची ट्रॉपी जिंकण्याचं बंगळुरूचं स्वप्न यंदा सत्यात उतरलं आणि रश्मिकाचा डॉयलॉगही सत्यात उतरला.

पंतप्रधान आवास योजनेच्या सर्वेक्षणाला मुदतवाढ!

केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांची घोषणा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

'पंतप्रधान आवास योजनेंतर्गत (पीएमएवाय) महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील एकही लाभार्थी बेघर राहू नये म्हणून पुन्हा सर्वेक्षण करण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच, या योजनेसाठी ग्रामीण भागात प्रतिमहा १० हजार रुपये असलेल्या उत्पन्नाची अट १५ हजार रुपये करण्यात आली आहे,' अशी घोषणा केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी मंगळवारी केली.

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) लाभार्थी मेळावा आणि महाआवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा समारंभात ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, ग्रामविकास विभागाचे राज्यमंत्री योगेश कदम, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, केंद्रीय ग्रामविकास विभागाचे सचिव गया प्रसाद, राज्याचे प्रधान सचिव एकनाथ डवले आदी उपस्थित होते. यावेळी 'अमृत महाअभियान गौरव गाथा' पुस्तकाचे प्रकाशन चौहान यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच,

प्रातिनिधिक स्वरूपात राज्यातील काही लाभार्थ्यांना घरकुलाची चावी देण्यात आली. मुख्यमंत्री फडणवीस आणि ग्रामविकासमंत्री गोरे यांनी राज्यात 'पीएमएवाय' योजनेतील लाभार्थ्यांच्या सर्वेक्षणाची मुदत संपुष्टात आली असून, मुदतवाढ मिळावी अशी मागणी भाषणात केली. त्यावेळी चौहान यांनी प्रतिसाद देत सर्वेक्षणाला मुदतवाढ देत असल्याचे जाहीर केले.चौहान म्हणाले, 'राज्यात २०१८ पासून 'पीएमएवाय' अंतर्गत लाभार्थ्यांना घरकुल वाटपाची उद्दिष्टपूर्ती साध्य झालेली नाही. अनेक लाभार्थी वंचित राहिले होते. योजनेसाठी केंद्र आणि राज्य सरकारने केवळ ग्रामीण भागासाठी ६५ हजार कोटींची गुंतवणूक केली आहे.

मात्र, विस्थापित कुटुंब, अनुपस्थिती, कागदपत्रांची पूर्तता आणि या योजनेचा लाभ घेण्यासाठी असणाऱ्या अटी अशा अनेक कारणांमुळे बहुतांश लाभार्थी वंचित राहिले होते. प्रत्यक्षात ही योजना गरिबांसाठी असल्याने प्रत्येकाला याचा लाभ मिळावा, राहणीमान सुधारावे म्हणून योजनेच्या अटींमध्ये बदल करून १० हजार मासिक उत्पन्न मर्यादेऐवजी १५ हजारापर्यंत करण्यात येत आहे.' 'ग्रामीण भागात अडीच एकर बागायती आणि पाच एकर जिरायती क्षेत्रफळापर्यंत शेती असणारे आणि दुचाकी असली, तरी आवास योजनेचा लाभ घेता येणार आहे. असेही चौहान म्हणाले.राज्यात 'पीएमएवाय' योजनेंतर्गत केंद्राने दिलेल्या यादीमध्ये लाभार्थ्यांची नावे नव्हती. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन पुन्हा सर्वेक्षण करण्याची मागणी केली. यावेळी सर्वेक्षण केल्यानंतर ग्रामीण भागात ३० लाख लाभार्थ्यांची नावे नोंदली गेली. मात्र, २०१९ मध्ये राज्यात महाविकास आघाडी सरकार सत्तेत आल्याने 'पीएमएवाय' योजनेचे काम बंद पडले.

त्यामुळे लाभार्थी वंचित राहिले, ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, ग्रामविकास विभागाचे राज्यमंत्री योगेश कदम, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, केंद्रीय ग्रामविकास विभागाचे सचिव गया प्रसाद, राज्याचे प्रधान सचिव एकनाथ डवले आदी उपस्थित होते.

सर्वेक्षणाची मुदत संपुष्टात

यावेळी 'अमृत महाअभियान गौरव गाथा' पुस्तकाचे प्रकाशन चौहान यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच, प्रातिनिधिक स्वरूपात राज्यातील काही लाभार्थ्यांना घरकुलाची चावी देण्यात आली.मुख्यमंत्री फडणवीस आणि ग्रामविकासमंत्री गोरे यांनी राज्यात 'पीएमएवाय' योजनेतील लाभार्थ्यांच्या सर्वेक्षणाची मुदत संपुष्टात आली असून, मुदतवाढ मिळावी अशी मागणी भाषणात केली. त्यावेळी चौहान यांनी प्रतिसाद देत सर्वेक्षणाला मुदतवाढ देत असल्याचे जाहीर केले.

वैष्णवीला कशा पद्धतीने त्रास दिला?

हगवणे कुटुंबीयांनी वैष्णवी यांना आत्महत्येस प्रवृत्त कसे केले

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

हगवणे कुटुंबीयांनी वैष्णवी यांना आत्महत्येस प्रवृत्त कसे केले, त्यांनी कसा त्रास दिला, याबाबतचा सखोल तपास करण्यात येत असल्याची माहिती बावधन पोलिसांनी मंगळवारी न्यायालयात दिली. वैष्णवी यांच्या बाळाचा बेकायदा ताबा घेणाऱ्या चव्हाणने काही त्रास दिला का, या दृष्टीनेही तपास करण्यात येत आहे.

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात पसार झालेल्या नीलेश रामचंद्र चव्हाण (वय ३४, रा. कर्वेनगर) याला पिंपरी-चिंचवड पोलिसांनी नेपाळ सीमेवरून अटक केली. वैष्णवी यांच्या मुलाचा ताबा घेण्यासाठी गेलेल्या कस्पटे कुटुंबीयांना चव्हाणने पिस्तुलाचा धाक दाखविला होता. वैष्णवी यांचा पती शशांक, सासू, लता आणि नणंद करिष्मा यांचे मोबाइल संच नीलेश चव्हाणकडून जप्त करण्यात आले आहेत. हगवणे कुटुंबीय चव्हाणच्या संपर्कात होते. त्यांचे संभाषण, संदेश, तसेच आर्थिक व्यवहारांची माहिती तपासात उघड झाली आहे.आत्महत्या प्रकरणात चव्हाण याच्यासह सासरे राजेंद्र तुकाराम हगवणे (वय ६३), दीर सुशील राजेंद्र हगवणे (वय २७, दोघे रा. भुकूम, मुळशी) यांना पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती.

त्यांच्या पोलिस कोठडीची मुदत मंगळवारी संपली. त्यानंतर तिघांना शिवाजीनगर न्यायालयात हजर करण्यात आले होते. वैष्णवी यांचा पती शशांक राजेंद्र हगवणे (वय २७), सासू लता राजेंद्र हगवणे (वय ५४), नणंद करिष्मा राजेंद्र हगवणे (वय ३१) यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली असून, सध्या ते येरवडा कारागृहात आहेत. बावधन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल विभुते यांनी न्यायालयात तपासाबाबत न्यायालयात माहिती दिली.नीलेश चव्हाणच्या पोलीस कोठडीत वाढ करण्याचे आदेश न्यायालयाने मंगळवारी दिले. सासरे राजेंद्र आणि सुशील यांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली असून, त्यांची येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आले. चव्हाणने हगवणे कुटुंबीयांना चिथावणी दिल्याचे तपासात निष्पन्न झाले होते. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी व्ही. पी. खंदारे यांनी चव्हाणच्या पोलीस कोठडीत सात जूनपर्यंत वाढ करण्याचे आदेश दिले. हगवणे पिता-पुत्रांना १६ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात पसार झालेल्या नीलेश रामचंद्र चव्हाण (वय ३४, रा. कर्वेनगर) याला पिंपरी-चिंचवड पोलिसांनी नेपाळ सीमेवरून अटक केली. वैष्णवी यांच्या मुलाचा ताबा घेण्यासाठी गेलेल्या कस्पटे कुटुंबीयांना चव्हाणने पिस्तुलाचा धाक दाखविला होता. वैष्णवी यांचा पती शशांक, सासू, लता आणि नणंद करिष्मा यांचे मोबाइल संच नीलेश चव्हाणकडून जप्त करण्यात आले आहेत.

चव्हाणच्या पोलीस कोठडीत वाढ

हगवणे कुटुंबीय चव्हाणच्या संपर्कात होते. त्यांचे संभाषण, संदेश, तसेच आर्थिक व्यवहारांची माहिती तपासात उघड झाली आहे.आत्महत्या प्रकरणात चव्हाण याच्यासह सासरे राजेंद्र तुकाराम हगवणे (वय ६३), दीर सुशील राजेंद्र हगवणे (वय २७, दोघे रा. भुकूम, मुळशी) यांना पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. त्यांच्या पोलिस कोठडीची मुदत मंगळवारी संपली.

नऊ वर्षानंतरही प्रवाशांची गैरसोय

पुणे-लोणावळा रेल्वे मार्ग विस्ताराला प्रतीक्षा!

उपनगरीय सेवेसाठी स्वतंत्र मार्गाची गरज

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

गेल्या तीन दशकांपासून पुणे-लोणावळा दरम्यान तिसरा व चौथा ट्रॅक व्हावा, यासाठी पुणे व शहरातील नागरिकांची, प्रवाशांची मागणी आहे. केंद्र सरकारने २०१५-१६ मध्ये पुणे-लोणावळा लोहमार्गावरील तिसरा आणि चौथ्या ट्रॅकची घोषणा केली. ही घोषणा होऊन नऊ वर्ष होत आले तरी तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेची प्रतीक्षा कायम आहे.

पुणे-लोणावळादरम्यान सुरू असलेल्या उपनगरीय रेल्वे सेवेला ४७ वर्षं पूर्ण झाली आहेत. केंद्र सरकारने २०१५-१६ मध्ये पुणे-लोणावळा लोहमार्गावरील तिसरा आणि चौथा ट्रॅक करण्याची घोषणा केली. त्याचा विकास आराखडा (डीपीआर) तयार केला. १५ फेब्रुवारी २०१९ मध्ये रेल्वे बोर्डाने महाराष्ट्र सरकारला प्रस्ताव पाठवला आहे. त्यासाठी २०१७ मध्ये केंद्रीय अर्थसंकल्पात तरतूद देखील केली, याचा ५०टक्के खर्च केंद्रीय रेल्वे विभाग आणि ५० टक्के राज्य सरकार अशी खर्चाची विभागणी आहे. राज्याच्या ५० टक्क्यांमध्ये पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिकेचा सहभाग राहणार आहे. राज्य सरकारने आपल्या हिश्श्याचा निधी न दिल्यामुळे प्रकल्पाला विलंब होत आहे.

पुणे-लोणावळा लोकलच्या दिवसभरात ६०.५९ किलोमीटर अंतर कापत दररोज लाखो प्रवाशांची ने-आण करीत ४४ फेऱ्या होत आहेत.कोरोनानंतर लोकलच्या फेऱ्या कमी झाल्या. शिवाजीनगरला लोकलसाठी विशेष प्लॅटफॉर्म तयार करून येथून तळेगाव आणि लोणावळ्यासाठी चौदा लोकल धावतात. नोव्हेंबर २०२३ मध्ये स्वयंचलित सिग्नल यंत्रणेचे काम पूर्ण झाले. त्यामुळे रेल्वेगाड्या अचूक वेळेत धावून प्रवासाच्या वेळेत बचत झाली. या मार्गावर असणारा लांब पल्ल्यांच्या गाड्यांचा ताण लक्षात घेता उपनगरीय सेवेसाठी स्वतंत्र मार्गाची अत्यंत गरज निर्माण झाली आहे.

> “पुणे-लोणावळादरम्यान तिसरा व चौथा ट्रॅक व्हावा, यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा, आंदोलने केली. त्यानंतर केंद्र सरकारने तिसरा व चौथा ट्रॅकची घोषणा केली; मात्र निधी न मिळाल्यामुळे प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली नाही. निधी देण्यास टाळाटाळ करणाऱ्या शासनाचा आणि दोन्ही महापालिकांचा आम्ही निषेध करतो. दुपारी १२ ते ३ या वेळेत एकही लोकल सेवा सुरू नसल्याने प्रवाशांचे मोठे हाल होतआहेत. त्यामुळे तिसरा व चौथ्या ट्रॅकच्या कामाला लवकरात लवकर सुरुवात करावी.
> **-गुलामअली भालदार,** अध्यक्ष, चिंचवड प्रवासी संघ

पुणे-लोणावळा दरम्यान रेल्वे स्थानके

पुणे, शिवाजीनगर, खडकी, दापोडी, कासारवाडी, पिंपरी, चिंचवड, आकुर्डी, देहूरोड, बेगडेवाडी, घोरावाडी, तळेगाव दाभाडे, वडगाव, कान्हे, कामशेत, मळवली, लोणावळा अशी ६०.५९ किलोमीटर अंतरावर १७ स्थानके आहेत. त्यातील शिवाजीनगर, खडकी, चिंचवड, देहूरोड, तळेगाव दाभाडे, मळवली या स्थानकांवर रेल्वे पासिंगसाठी सुविधा उपलब्ध आहे.

विस्तारीकरणाचे नियोजन

रेल्वे स्थानकावर फूटओव्हर ब्रिज, प्रशस्त व नवी प्रतीक्षा रूम, प्रत्येक फलाटावर स्वच्छतागृह, विद्युत व्यवस्था, सिग्नल, दिव्यांगासाठी सोयी सुविधा, पर्यावरणपूरक वातावरण, आवश्यकतेनुसार लिफ्ट, दोन सरकते जिने, मोफत वाय-फाय, अत्याधुनिक सूचना प्रणाली, वाहनतळासाठी जागा, शेड उपलब्ध करून दिले जाण्याचे नियोजन केले आहे.

पिंपरी पालिका हरित कर्ज रोख्यांतून निधी उभारणार!

अभिनव पाऊल; राज्यातील पहिली महापालिका! 200 कोटी रुपयांचा निधी ; गुंतवणूकदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी चिंचवड महापालिकेने हरित कर्ज रोखे (ग्रीन बॉण्ड) इश्यू करून २०० कोटी रुपयांचा निधी यशस्वीरित्या उभारला असून, अशी कामगिरी करणारी महाराष्ट्रातील पहिली महापालिका ठरली आहे. महापालिकेने हे रोखे बीएसईच्या इलेक्ट्रॉनिक निविदा प्रणालीवर खासगी गुंतवणुकीच्या माध्यमातून इश्यू केले. या इश्यूला गुंतवणूकदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.

गुंतवणूकदारांचा पीसीएमसीवर असलेला विश्वास अधोरेखित करत, इश्यू सुरू होताच केवळ एका मिनिटात १०० कोटी रुपयांचा मूळ भाग भरला गेला, तर एकूण ५१३ कोटी रुपयांच्या निविदा प्राप्त झाल्या, म्हणजेच रोख्याला ५.१३ पट अधिक मागणी मिळाली.

'एए प्लस' पतमानांकन

या हरित कर्ज रोखा इश्यूला क्रिसिल आणि केअर या मान्यताप्राप्त पतमापन संस्थांकडून 'एए+' (AA+) दर्जा मिळाला आहे. ए. के. कॅपिटल सर्व्हिसेस लिमिटेड यांनी या इश्यूसाठी व्यवहार सल्लागार आणि मर्चंट बँकर म्हणून काम पाहिले.या रोख्यांचा कालावधी पाच वर्षांचा असून, त्यासाठी ७.८५ टक्के स्पर्धात्मक व्याजदर निश्चित करण्यात आला आहे. परतफेडीची हमी सुनिश्चित करण्यासाठी मालमत्ता करातून मिळणाऱ्या उत्पन्नाचे राष्ट्रीयकृत बँकेत एस्क्रो खाते तयार करण्यात आले आहे.या यशस्वी इश्यूमुळे पीसीएमसीला भारत सरकारकडून २० कोटी रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देखील मिळणार आहे.

या प्रकल्पांसाठी वापरला जाणार निधी

हरित कर्ज रोख्यांतून उभारलेला निधी निगडी प्राधिकरणातील हरित सेतू प्रकल्प आणि गवळी मठ ते इंद्रायणी नगर चौक दरम्यानचा टेल्को रस्ता विकास प्रकल्प या दोन महत्त्वाच्या पायाभूत प्रकल्पांसाठी वापरण्यात येणार आहे. हे दोन्ही प्रकल्प महापालिकेच्या शाश्वत व हवामानानुकूल शहरी विकास दृष्टिकोनाचा भाग आहेत.

> “पिंपरी चिंचवड महापालिकेने हरित कर्ज रोखे इश्यू करताच त्याला मिळालेला उदंड प्रतिसाद पाहता, पिंपरी चिंचवडच्या शाश्वत भविष्याबद्दल गुंतवणूकदारांचा महापालिकेवर विश्वास असल्याचे स्पष्ट होते. या निधीमुळे शहरात महत्त्वाचे पर्यावरणपूरक प्रकल्प गतीने राबवणे शक्य होणार आहे.
> **-शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका

श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



परमार्थ कसा साधेल.

ज्याच्यापासून माया उत्पन्न झाली, त्याला शरण जावे. त्याला शरण जाण्याच्या आड काय येते ते पाहावे. कर्तेपण टाका म्हणजे शरण जाता येते. माझेपणाने मिरविता आणि अभिमान कायम ठेवता, मग भगवंताला शरण कसे जाता येईल ? आपण संताच्या दर्शनाला जातो, आणि बायकोचे दुखणे बरे व्हावे असे म्हणतो; मग ते दर्शन खरे झाले म्हणायचे का ? पोराबाळांकरता, बायकोकरता, संतांकडे नाही जाऊ. संतांनी नामस्मरण करायला सांगितले, परंतु मुलगा वाचत नाही असे पाहिले की आपली रामावरची, नामस्मरणावरची, श्रद्धा उडते म्हणजे मी विषयाकरिता नाम घेतो असेच झाले ! विषय सुटावेत असे वाटते, पण ते सुटतच नाहीत. याचे कारण आमची बलवत्तर इच्छाच नसते. संन्यास घ्यायला निघाला तर बायको पोर घेऊन आडवी येते; तिला दूर सारून निघाला, पण पुढे मोहात पडून परस्त्री करण्याची वेळ येते ! माणूस व्यसनाकरिता हे सर्व करतो, परंतु परमार्थाकरिता विषय आणि मोह दूर करून साधन कर म्हटले, तर निरनिराळ्या सबबी आपल्या डोळ्यांसमोर उभ्या राहतात. चोवीस वर्षे अभ्यास केला तरी पोटभर खायला मिळत नाही, मग परमार्थ मात्र दोन वर्षांत साध्य व्हावा असे कसे म्हणावे ?

शांती ही परमार्थाची पहिली पायरी आहे. परमार्थ हा समजुतीचा आहे, उगीच कष्ट करण्याचा किंवा पारायणाचा नाही. बद्रीनारायणाची यात्रा करूनही तो साधणार नाही. त्यापेक्षा भगवंताच्या अनुसंधानात राहिल्याने जास्त फायदा होईल. काही खेळ जसे एकट्यानेच खेळायचे असतात, तसा परमार्थ हा आपल्याशीच करायचा खेळ आहे. तो आपल्याशीच करायचा अभ्यास आहे. खेळात काही बाह्य साधन तरी लागते, पण या अभ्यासात त्याचीही जरुरी नसते. परमार्थ हा वृत्ती सुधारण्याचा अभ्यास आहे. आपला परमार्थ जगाला जितका कमी दिसेल, तितका आपल्याला फायदेशीर आहे. जगातल्या मोठेपणात मुळीच सार्थक नाही. खरा मोठेपणा नसताना उगीच मोठेपणा वाटणे, हा तर फार मोठा घात आहे. अंतर्यामी स्थिर होणे, स्वस्थता येणे, सावधानता ठेवणे, दगदग सोडणे हाच परमार्थ होय. सतत आनंद मिळावा यासाठी प्रयत्न करणे, याचेच नाव परमार्थ. ' जग काय म्हणेल ' म्हणून वागणे याचे नाव व्यवहार आणि ' भगवंत काय म्हणेल ' म्हणून वागणे हाच परमार्थ.

बोधवचन:- कर्तव्यात भगवंताचे स्मरण हेच परमार्थाचे सार.

'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक

पहलगाम येथील भ्याड दहशतवादी हल्ल्यानंतर आणि भारताने हाती घेतलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' च्या कारवाईनंतर सर्वच राजकीय पक्षांमध्ये घुमशान सुरू आहे. भारताची बाजू घेऊन देशप्रेम दाखवणे हे अपेक्षित आहे. पण, अनेकांना पुळका आहे तो पाकिस्तानचा !

जणू काही पाकिस्तानचे प्रवक्तेच !

काँग्रेस पक्ष, तृणमूल काँग्रेस पक्ष, समाजवादी पक्ष, उबाठा गट यांनी उघड उघड भारताविरुद्ध भूमिका घेतली असून पाकचे प्रवक्ते असल्याप्रमाणे या पक्षांचे नेते बोलत आहेत. अर्थात, भारताने जागतिक पातळीवर भूमिका मांडण्यासाठी काही प्रतिनिधी पाठवले आहेत, त्यातील काँग्रेसचे नेते मात्र भारताची भूमिका मांडत आहेत. परतल्यानंतर त्यांची पक्षातून हकालपट्टी होण्याची शक्यता जास्त आहे.

राहुल गांधी वादग्रस्तच..

काँग्रेस नेते राहुल गांधी हे पाकिस्तानची भूमिका जास्त भक्कमपणे मांडत आहेत आणि नरेंद्र मोदी हे कसे चुकले, याचे विश्लेषण करत आहेत. राहुल गांधी, विजय वडेट्टीवार किंवा संजय राऊत यांचे व्हीडिओज तर पाकच्या चॅनेल्स वरून प्रसारित होत आहेत आणि त्या आधारे भारतावर गरळ ओकण्याचा पाकड्यांचा धंदा सुरू आहे.

राहुल गांधी पाकमध्ये प्रसिद्ध..

सतत भारत द्वेषापोटी आणि नरेंद्र मोदी द्वेषापोटी वक्तव्य करण्यामुळे राहुल गांधी हे मात्र पाकमध्ये लोकप्रियतेच्या उच्च शिखरावर आहेत. त्यामुळे भाजपाचे अनेक नेते त्यांना 'निशान-ए-पाकिस्तान' हा त्यांचा सर्वोच्च नागरी पुरस्कार द्यावा, म्हणून पाककडे आग्रह करीत आहेत.

'निशान-ए-पाकिस्तान' म्हणजे काय?

'निशान-ए-पाकिस्तान' हा पाकचा सर्वोच्च नागरी पुरस्कार आहे. भारतातील भारतरत्न पुरस्काराप्रमाणेच हा पुरस्कार देऊन त्यांच्याकडे गौरवण्यात येते. १९५७ मध्ये 'डेकोरेशन ॲक्ट' अंतर्गत त्याची स्थापना करण्यात आली आहे. पाकच्या राष्ट्रीय हितासाठी अत्यंत विशिष्ट सेवा देणाऱ्यांना तो प्रदान केला जातो. निशान-ए-पाकिस्तान व्यतिरिक्त देशात निशान-ए-इम्तियाज आणि तमघा-ए-पाकिस्तान यांसारखेही नागरी पुरस्कार देण्यात येतात. दरवर्षी दि.१४ ऑगस्टला पाकिस्तानच्या स्वातंत्र्यदिनी हे पुरस्कार जाहीर केले जातात आणि दि. २३ मार्च या पाकिस्तान दिनाच्या वेळी पुरस्कारविजेत्यांना हा पुरस्कार प्रदान केला जातो.

निशान-ए-पाकिस्तानचे मानकरी राहुल गांधीच?



टीका करण्याचा भाजपाचा उद्देश..

भाजपाने राहुल गांधी यांच्यावर टीका करण्यासाठी या पुरस्काराचा उल्लेख केला, म्हणून खऱ्या अर्थाने तो चर्चेला गेला. 'ट्विटर' वरील एका पोस्टमध्ये पाकिस्तानी लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्या चेहऱ्यावर गांधींचा चेहरा ओव्हरलॅप करून तयार केलेला एक फोटो मालवीय यांनी दाखवला. या फोटोसह त्यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे की, राहुल गांधी हे पाकिस्तान आणि त्यांच्या हितचिंतकांची भाषा बोलत आहेत, यात आश्चर्य नाही. भारताचे वर्चस्व सिद्ध करणाऱ्या 'ऑपरेशन सिंदूर' बाबत त्यांनी पंतप्रधानांचे अभिनंदनही केले नाही. उलट या ऑपरेशनमध्ये आपण किती विमाने गमावली, हाच प्रश्न ते विचारत आहेत. तसेच संघर्षादरम्यान किती पाक विमाने पाडण्यात आली किंवा भारतीय सैन्याने पाकच्या एअरबेसवर हल्ला केला तेव्हा किती एअरबेस नष्ट करण्यात आले, याबाबत मात्र एकदाही विचारले नाही, यापुढे त्यांनी राहुल गांधी यांचा उल्लेख पाकधार्जिणा नेता असा केला आहे.

राहुल गांधींसाठी आता पुढे काय?

मालवीय यांच्या या टीकेनंतर काँग्रेसननेही लगेचच पलटवार केला. त्यांच्या प्रवक्त्याने असे म्हटले, की त्यांचे नेते आणि काँग्रेसचे नसलेले भारताचे पहिले पंतप्रधान मोरारजी देसाई हे अजूनही असे एकमेव राजकारणी आहेत, ज्यांना हा सर्वोच्च पाकिस्तानी सन्मान देण्यात आला आहे. आणखी काही लोक या पुरस्कारासाठी पात्र आहेत. लालकृष्ण अडवाणी यांनी जिना यांना धर्मनिरपेक्ष म्हटले होते. आमंत्रित न करताही नवाज शरीफ यांच्यासोबत बिर्याणी खायला जाणारे नरेंद्र मोदी हेदेखील त्यासाठी पात्र आहेत. भाजपा आणि काँग्रेस मधील हा वाद आता टोकाला पोहोचला आहे.

काँग्रेसचीही खरपूस टीका..

काँग्रेस समितीचे संपर्क प्रमुख जयराम रमेश यांनीदेखील या पुरस्काराबाबत उल्लेख केला. "माजी पंतप्रधान मोरारजी देसाई यांना पाकिस्तानचा सर्वोच्च नागरी सन्मान निशान-ए-पाकिस्तान मिळाला. देसाईंच्या मंत्रिमंडळात अटलबिहारी वाजपेयी हे परराष्ट्रमंत्री होते, हे तरी भाजपाने लक्षात ठेवले पाहिजे, असे जयराम रमेश म्हणाले.

देसाईंना हा पुरस्कार का मिळाला?

१९७७ मध्ये आणीबाणीनंतर झालेल्या निवडणुकीत मोरारजी देसाई पंतप्रधानपदी आले. त्यावेळी इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेसचा पराभव झाला. त्यांनी जनता पक्षाच्या सरकारचे नेतृत्व केले आणि अनेक काँग्रेसविरोधी पक्षांचा समावेश त्यात होता.

मोरार्जींचा शांततेसाठी गौरव

मोरारजी देसाई यांनी पंतप्रधानपद सोडल्यानंतर बऱ्याच काळानंतर पाकिस्तान सरकारने त्यांना निशान-ए-पाकिस्तान पुरस्कार प्रदान केला. १९७१ च्या युद्धानंतर भारत-पाकिस्तान संबंध सुरळीत करण्यासाठी देसाईंच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात (१९७७-१९७९) त्यांनी केलेल्या राजनैतिक उपाययोजना आणि घेतलेली युद्धविरोधी भूमिका यामुळे देसाई यांची निवड केली गेल्याचे इस्लामाबादकडून सांगण्यात आले. वाजपेयी परराष्ट्रमंत्री असताना इस्लामाबादला गेले होते. त्यावेळी त्यांनी दोन्ही देशांमध्ये भेटी, देवाण-घेवाण करणे, व्हिसा सुविधा उदारीकरण करणे आणि एकमेकांच्या फायद्यासाठी व्यापारात सुधारणा करणे यांसारख्या योजनांची घोषणा केली होती.

देसाईंना दोन्ही देशांचे सर्वोच्च पुरस्कार..

भुट्टो सरकारने त्यांच्यासाठी निशान-ए-पाकिस्तान जाहीर केल्यानंतर काँग्रेसने देसाईंना पुरस्कार स्वीकारू नये, अशी विनंती केली होती. असा आक्षेप असतानाही देसाई यांनी १९९० मध्ये तो पुरस्कार स्वीकारला. १९९१ मध्ये मोरारजी देसाईंना भारतरत्न प्रदान करण्यात आला. अशा प्रकारे देसाई दोन्ही देशांमधील सर्वोच्च नागरी सन्मानाचे मानकरी ठरले आहेत.

इतर भारतीयही मानकरी..

२०२० मध्ये इम्रान खान सरकारने जम्मू-काश्मीरचे फुटीरतावादी नेते व हुर्रियत कॉन्फरन्सचे नेते सय्यद अली शाह गिलानी यांना पाकला पाठिंबा देण्याचे आणि काश्मीरच्या हिताच्या वचनबद्धतेसाठी या पुरस्काराने सन्मानित केले होते.

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

कर्मचाऱ्यांना 53 टक्के महागाई भत्ता!

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना जूनपासून ५३ टक्के महागाई भत्ता मिळणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केली. मूळ वेतनावर ५३ टक्के महागाई भत्ता अदा करण्यात येईल असं एकनाथ शिंदेंनी सांगितलं. महागाई भत्ता वाढीमुळे सरकारच्या तिजोरीवर दर महिन्याला १९ कोटींचा आर्थिक भार वाढणार आहे. महागाई भत्त्याच्या थकबाकीबाबत निधीची उपलब्धता पाहून यथावकाश निर्णय घेण्यात येईल, असंही एकनाथ शिंदेंनी स्पष्ट केलं.

एसटी कर्मचाऱ्यांनी राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढीचा दर लागू केला आहे. महागाई भत्याची २०१८ पासूनची थकबाकी प्रलंबित आहे. न्यायालयाने थकबाकी देण्याबाबतचा निर्णय दिल्यानंतरही त्याची अंमलबजावणी झालेली नव्हती. त्यामुळे आता महागाई भत्ता ५३ टक्के इतका लागू करण्यात आला आहे, अशी घोषणा एकनाथ शिंदेंनी केली.सध्या एसटी महामंडळाच्या अनेक विभागांमध्ये कुशल मनुष्यबळाचा अभाव आहे. अनेक ठिकाणी चांगले शिक्षण अधिकारी आवश्यक असून विशेषतः भविष्यात पीपीपी तत्त्वावर विकसित होणाऱ्या एसटीच्या जागे बाबतीत बांधकाम विभागाकडे कुशल अभियंत्यांची गरज भासणार आहे.त्यामुळे सध्या रिक्त असलेल्या अभियंत्यांच्या जागा करार पद्धतीने आणि सरळ सेवा भरतीच्या माध्यमांतून भरण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. नव्या नोकर भरतीच्या अनुषंगाने एसटीच्या प्रत्येक खात्यांनी आपल्या विभागातील रिक्त पदांचा फेर आढावा घेऊन आवश्यक असणाऱ्या पदांची भरती करणे संदर्भात एकत्रित मागणी सादर करावी, असे निर्देश संबंधित देण्यात आल्याची माहिती यावेळी मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.एसटीच्या सक्षमीकरणासाठी कुशल मनुष्य बळाबरोबरच तांत्रिकदृष्ट्या सक्षम अधिकाऱ्यांची भविष्यात एसटीला गरज भासणार असून त्या अनुषंगाने भारती प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याचंही प्रताप सरनाईक म्हणाले आहेत. शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढीचा दर लागू केला आहे. महागाई भत्याची २०१८ पासूनची थकबाकी प्रलंबित आहे.

न्यायालयाने थकबाकी देण्याबाबतचा निर्णय दिल्यानंतरही त्याची अंमलबजावणी झालेली नव्हती. त्यामुळे आता महागाई भत्ता ५३ टक्के इतका लागू करण्यात आला आहे, अशी घोषणा एकनाथ शिंदेंनी केली.सध्या एसटी महामंडळाच्या अनेक विभागांमध्ये कुशल मनुष्यबळाचा अभाव आहे. अनेक ठिकाणी चांगले शिक्षण अधिकारी आवश्यक असून विशेषतः भविष्यात पीपीपी तत्त्वावर विकसित होणाऱ्या एसटीच्या जागे बाबतीत बांधकाम विभागाकडे कुशल अभियंत्यांची गरज भासणार आहे.त्यामुळे सध्या रिक्त असलेल्या अभियंत्यांच्या जागा करार पद्धतीने आणि सरळ सेवा भरतीच्या भरण्यात येणार असल्याची माहितीदेण्यात आली.

2018 पासूनची थकबाकी प्रलंबित

नव्या नोकर भरतीच्या अनुषंगाने एसटीच्या प्रत्येक खात्यांनी आपल्या विभागातील रिक्त पदांचा फेर आढावा घेऊन आवश्यक असणाऱ्या पदांची भरती करणे संदर्भात एकत्रित मागणी सादर करावी, असे निर्देश संबंधित देण्यात आल्याची माहिती यावेळी मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.एसटीच्या सक्षमीकरणासाठी कुशल मनुष्य बळाबरोबरच तांत्रिकदृष्ट्या सक्षम अधिकाऱ्यांची भविष्यात एसटीला गरज भासणार असून त्या अनुषंगाने भारती प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याचंही प्रताप सरनाईक म्हणाले आहेत.एसटी कर्मचाऱ्यांनी राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढीचा दर लागू केला आहे. महागाई भत्याची २०१८ पासूनची थकबाकी प्रलंबित आहे. न्यायालयाने थकबाकी देण्याबाबतचा निर्णय दिल्यानंतरही त्याची अंमलबजावणी झालेली नव्हती.

आता विखे – थोरात समर्थकांत जुंपली!

15 व्या वित्त आयोगाच्या निधीतून अपहार केल्याचा आरोप

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

तालुक्यातील जोर्वे ग्रामपंचायतीत भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. मासिक सभा, ग्रामसभांमधील अनियमिततेसह १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून झालेल्या खरेदीतील गैरव्यवहारांबाबत ग्रामस्थांनी गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देत चौकशी न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला. दरम्यान गैरव्यवहाराचे आरोप झालेले आजी-माजी सरपंच हे नात्याने पती-पत्नी असून पालकमंत्री राधाकृष्ण विखे समर्थक आहेत.

दुसरीकडे महायुतीच्या कार्यकर्त्यांनी गुंजाळवाडीच्या सरपंचावर कारवाईची मागणी केली आहे.गटविकास अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात गावकऱ्यांनी म्हटले आहे की, सन २०२२-२३ या वर्षात तत्कालीन उपसरपंच गोकुळ दिघे आणि ग्रामविकास अधिकारी यांनी सुमारे ८.५३ लाखांचा अपहार केला आहे. यात बाकडे खरेदी, मेडीक्लोर औषध खरेदीसाठी आणि औषध फवारणी व इतर औषध खरेदीसाठी बोगस बिलांचा समावेश आहे. तसेच, २०२४-२५ या आर्थिक वर्षात (१५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून) विद्यमान सरपंच प्रीती गोकुळ दिघे आणि ग्रामविकास अधिकारी यांनी संगनमताने अपहार केल्याचा गंभीर आरोप आहे.यामध्ये महिला सबलीकरणाच्या नावाखाली ४ लाख १२ हजार ५६० च्या शिलाई मशीन खरेदी आणि २,९९,००० रुपयांच्या कचराकुंडी खरेदीतील गैरव्यवहारांचा समावेश आहे. 'नल-जलमित्र' योजनेतही अनियमितता झाल्याचा आरोप आहे, जिथे पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांऐवजी तिसऱ्याच व्यक्तीच्या खात्यावर सुमारे ५० हजार रुपये वळवण्यात आले. 'आपले सरकार' पोर्टलवर तक्रार करूनही चौकशी झाली नसल्याचे व राजकीय दबावामुळे दोषींना पाठीशी घातले जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. सात दिवसांत गैरव्यवहाराची चौकशी करावी अन्यथा जोर्वे ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ करतील असा इशारा दिला आहे.

राजकीयदृष्ट्या संवेदनशील

जोर्वे हे काँग्रेसचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे जन्मगाव आहे. या गावातल्या सहकारी संस्थेपासूनच थोरात यांच्या राजकारणाची सुरुवात झाली होती. हे गाव संगमनेर तालुक्यात असले तरी विधानसभेसाठी मात्र मंत्री विखे यांच्या शिर्डी मतदारसंघात आहे. गावची ग्रामपंचायत आणि सर्व संस्थांवर प्रदीर्घ काळापासून थोरात गटाचे वर्चस्व राहिले आहे. मात्र सध्या ग्रामपंचायतमध्ये मंत्री विखे समर्थक सरपंच, थोरात समर्थक उपसरपंच आहेतदोन-चार दिवसांपूर्वी झालेल्या गावच्या ग्रामसभेत गैरव्यवहाराच्या कारणावरून चांगलाच राडा झाल्याची माहिती मिळाली.२०२४-२५ या आर्थिक वर्षात (१५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून) विद्यमान सरपंच प्रीती गोकुळ दिघे आणि ग्रामविकास अधिकारी यांनी संगनमताने अपहार केल्याचा गंभीर आरोप आहे.

आसाममध्ये काँग्रेस नेतृत्वात बदल!

» गौरव गोगोई यांच्याकडे प्रदेशाध्यक्षपदाची सूत्रे

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

काँग्रेसचे लोकसभेचे खासदार गौरव गोगोई यांनी मंगळवारी आसामचे पक्षाचे प्रदेशाध्यक्षपद म्हणून सूत्रे स्वीकारली. पक्षातर्फे गेल्या आठवड्यात त्यांच्या नियुक्तीची घोषणा करण्यात आली होती. राज्यात पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. गौरव हे आसामचे माजी मुख्यमंत्री तरुण गोगोई यांचे पुत्र आहेत.

गोगोई यांनी मंगळवारी राजीव भवन या पक्षाच्या राज्य मुख्यालयात मावळते प्रदेशाध्यक्ष भूपेन कुमार बोरा यांच्याकडून नेतृत्वाची सूत्रे हाती घेतल्यानंतर 'लढाई सुरू आहे' अशी घोषणा दिली आणि निवडणुकीच्या तयारीला लागावे असा संदेश पक्ष कार्यकर्त्यांना दिला. यावेळी पक्षाचे सरचिटणीस जितेंद्र सिंह आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेते देबब्रत सैकिया हे उपस्थित होते.राज्यातील भाजप सरकारचा पराभव करण्यासाठी आपल्याला समाजाच्या सर्व घटकांनी पाठिंबा द्यावा असे आवाहन गोगोई यांनी केले. काँग्रेसला आसाममध्ये सौहार्द आणि सर्वसमावेशक विकास करणारे सरकार आणायचे आहे असे ते म्हणाले. आपला पक्ष समानता आणि समावेशकतेच्या विचारसरणीवर पुढे काम करत राहील असे गोगोई यांनी कार्यमाक्रमानंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले.ईशान्य भारतातील पूरग्रस्त राज्यांना शक्य ती सर्व मदत केली जाईल असे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी दिले. आसाम, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, मेघालय, मिझोरम, सिक्कीम, त्रिपुरा या राज्यांमध्ये गेल्या काही दिवसांपासून सतत सुरू असलेल्या पावसामुळे तेथील पूरस्थिती कायम आहे. त्यामुळे तेथील नागरिकांना बाहेर काढून त्यांना मदत शिबिरांमध्ये पाठवण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी आसामचे मुख्यमंत्री हिमांता बिस्वा सरमा आणि सिक्कीमचे मुख्यमंत्री प्रेम सिंह तमांग यांच्याशी स्वतंत्रपणे चर्चा करून परिस्थितीचा आठावा घेतला. तसेच त्यांनी मणिपूरचे राज्यपाल अजय भल्ला यांच्याकडूनही तेथील परिस्थितीची माहिती घेतली. ईशान्य भारतात विविध ठिकाणी पावसाशी संबंधित घटनांमध्ये आतापर्यंत ३६ जणांचा बळी गेला असून साडेपाच लाखांपेक्षा जास्त लोकांना पुराचा फटका बसला आहे.आसाममध्ये २० जिल्ह्यांतील जवळपास ५.३५ लाख लोकांना पूरस्थितीने प्रभावित झाले आहेत. अनेक ठिकाणी रस्ते आणि रेल्वे वाहतूक थांबवण्यात आली आहे. तसेच ब्रह्मपुत्रा, बराक आणि कोपिली या नद्या अनेक ठिकाणी धोक्याच्या पातळीवरून वाहत आहेत. मणिपूरमध्ये ५६ हजारांपेक्षा जास्त लोकांना पुराचा फटका बसला असून तब्बल १० हजार ४७७ घरांचे नुकसान झाले आहे. मिझोरममध्ये १० जिल्ह्यांमधील सर्व शाळा मंगळवारी सलग चौथ्या दिवशी बंद राहिल्या. सिक्कीममध्ये छातेन येथे अडकलेल्या ३४ जणांची सुटका करण्यात आली. मिझोरममध्ये १० दिवसांपासून पडत असलेल्या पावसामुळे तेथील परिस्थिती बिकट झाली आहे. आतापर्यंत त्या राज्यात पावसाने पाच जणांचा बळी गेला

चम्फाई जिल्ह्यात सर्वाधिक नुकसान

असून भूस्खलनाच्या ५५२ घटना घडल्या आहेत. तसेच १५२ घरांचे पूर्ण किंवा अंशत: नुकसान झाले असल्याची माहिती राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन आणि पुनर्वसन विभागाने मंगळवारी दिली. मिझोराममधील ११ जिल्ह्यांपैकी म्यानमारला लागून असलेल्या चम्फाई जिल्ह्यात सर्वाधिक नुकसान झाले आहे. तिथे २०९ ठिकाणी भूस्खलन झाले असून तिघांचा मृत्यू झाला आहे.पंतप्रधानांनी आज सकाळी मला फोन केला आणि मी त्यांनी राज्यातील पूरग्रस्त लोकांच्या समस्यांबद्दल माहिती दिली. त्यांनी मला सर्व ती मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. मदतवाटपाची दीर्घ प्रक्रिया बाजूला ठेवून लोकांना मदत करावी असे आदेश मी प्रशासनाला दिले आहेत.

एलॉन मस्क यांचे वडील भारत दौऱ्यावर!

» राम मंदिरालाही देणार भेट, दौऱ्यामागे नेमकं कारण काय?

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

तंत्रज्ञान क्षेत्रातील अब्जाधीश एलॉन मस्क यांचे वडील एरॉल मस्क १ जूनपासून भारताच्या दौऱ्यावर आहेत. रविवारी ते दिल्लीत आले आणि शुक्रवारी ते दक्षिण आफ्रिकेला रवाना होण्याची शक्यता आहे. भारतात असताना एरॉल मस्क अयोध्येतील राम मंदिराला भेट देणार आहेत. गुरूवारी ४ जून रोजी ते अयोध्येला जाणार असल्याची माहिती आहे. तसेच व्यवसायाशी संबंधित अनेक बैठकांमध्येही ते सहभागी होतील. १ ते ६ जूनपर्यंत ते भारतात असणार आहेत. एरॉल मस्क यांच्याविषयी आणि त्यांच्या भारत दौऱ्याचे काय नियोज हे? ...

पीटीआय या वृत्तसंस्थेने शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये एरॉल मस्क यांचे भारतात आगमन झाल्यावर त्यांचे जोरदार स्वागत झाले. टेस्ला व स्पेसएक्सचे सीईओ एलॉन मस्क यांचे वडील एरॉल यांचा हा दौरा व्यावसायिक व सांस्कृतिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा ठरेल. ते सुमारे पाच दिवसांच्या भारत दौऱ्यावर असतील आणि त्यापैकी एका दिवशी ते अयोध्येलाही भेट देतील. माध्यमांच्या रिपोर्ट्सनुसार, एरॉल मस्क यांची ही भेट व्यावसायिक बैठकांशी, तसेच भारताच्या सांस्कृतिक वारशाशी जोडलेली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, देशांतर्गत ईव्ही चार्जिंग कंपनी 'सर्वोटेक'च्या जागतिक सल्लागार मंडळात सामील झाल्यानंतर ते भारतात येत आहेत. त्यांचा हा भारत दौरा पाच दिवसांचा (१ जून ते ६ जूनपर्यंत) असेल आणि त्यानंतर ते आफ्रिकेला रवाना होतील.ते हरियाणाच्या सफियाबाद येथील 'सर्वोटेक'च्या सौर व ईव्ही चार्जर उत्पादन सुविधेला भेट देतील आणि वृक्षारोपण मोहिमेतही सहभागी होतील. या कार्यक्रमांना अनेक राज्यमंत्री आणि उच्च अधिकारी उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. 'द टाइम्स ऑफ इंडिया'ने दिलेल्या वृत्तानुसार, मस्क यांच्या शाश्वतता आणि पर्यावरणाभोवतीच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या'पर्यावरण दिननिमित्त् वृक्षारोपण मोहीम राबविण्यात येणार आहे.

एलॉन मस्क - एरॉल मस्क संबंध

"सर्वोटेक रिन्यूएबल कुटुंबात आम्ही एरॉल मस्क यांचे स्वागत करतो. स्मार्ट भविष्य घडविण्याच्या आमच्या मोहिमेला गती देण्यासाठी त्यांचा अफाट अनुभव, सखोल जागतिक अंतर्दृष्टी व नवीन उपक्रमासाठीची अढळ आवड या गोष्टी मौल्यवान ठरतील", असे 'सर्वोटेक'चे व्यवस्थापकीय संचालक रमन भाटिया यांनी म्हटले आहे.या वर्षाच्या सुरुवातीला एका पॉडकास्ट कार्यक्रमात एरॉल मस्क यांनी त्यांचा मुलगा एलॉन मस्कवर उघडपणे टीका केली होती. एलॉन एक चांगला पिता आहे, असे त्यांना वाटते का, असे विचारले असता, एरॉल यांनी, नाही, असे उत्तर दिले आणि तो आयांवर खूप अवलंबून होता, असे म्हटले. त्यांनी असेही म्हटले की, एलॉन आपल्या मुलांसोबत पुरेसा वेळ घालवत नव्हता.

आरसीबी विजयानंतर पृथ्वीक प्रतापची खास पोस्ट!

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने तब्बल १७ वर्षांनी आयपीएलच्या ट्रॉफीवर आपलं नाव कोरलं आहे. RCB च्या विजयानंतर मैदानावरच विराट कोहलीला अश्रू अनावर झाले होते. अंतिम सामन्यात पंजाब किंग्जवर ६ धावांनी मात करत बंगळुरूने आयपीएलच्या विजेतेपदाला गवसणी घातली आहे. यानिमित्ताने आरसीबी संघाचा माजी कर्णधार आणि पहिल्या हंगामापासून संघाचा भाग असलेल्या विराट कोहलीचं आयपीएल चॅम्पियन व्हायचं स्वप्न अखेर साकार झालं. संपूर्ण देशभरातून सध्या RCB टीमचं कौतुक करण्यात येत आहे. बॉलीवूडसह मराठी कलाविश्वातील कलाकारांनी विराटच्या टीमवर शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.RCB च्या विजयानंतर मराठी कलाविश्वातील अनेक कलाकारांनी विराट कोहलीचं कौतुक करत पोस्ट शेअर केल्या आहेत. गौरव मोरे, पुष्कर जोग, पियुष रानडे, अनघा अतुल, रुचिरा जाधव, योगिता चव्हाण, शुभंकर तावडे या सगळ्या कलाकारांनी पोस्ट शेअर करत आनंद व्यक्त केला आहे.तर, 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम अभिनेता पृथ्वीक प्रताप विराटबद्दल लिहितो, "या माणसाला खूप प्रेम...#KOHLIPAGLU... विराट तू मला संयम, समर्पण, निष्ठा, आवड आणि स्वत:वर



भरपूर विश्वास ठेवायला शिकवलंस... धन्यवाद कोहली."प्रसिद्ध लेखक क्षितीज पटवर्धनने इन्स्टाग्राम स्टोरीला विराट व एबी डिविलियर्स तसेच विरुष्काचा एकमेकांना मिठी मारतानाचा फोटो कोलाज करून शेअर केला आहे. यामध्ये कोहली भावुक झाल्याचं पाहायला मिळत आहे.तुम्ही फक्त ट्रॉफी जिंकण्यासाठी खेळू नका... तुम्ही कायम या मिठीसाठी खेळा...केवळ विराटच नाहीतर सचोटी, निष्ठा, संयम आणि पाठपुरावा या सगळ्या मूल्यांचा आज विजय झालाय" अशी पोस्ट शेअर करत क्षितीजने RCB चं कौतुक केलं आहे.दरम्यान, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करताना ९ विकेट्स गमावत १९० धावा केल्या होत्या. बंगळुरूने पंजाबसमोर १९१ धावांचं लक्ष्य ठेवलं होतं. हे लक्ष्य गाठण्यात श्रेयर अय्यरच्या संघाला अपयश आलं आणि तब्बल १७ वर्षांनी आरसीबीने आयपीएलच्या चषकावर आपलं नाव कोरलं.

अदाने नेसली चक्क 15 रुपयांची साडी

'द केरला स्टोरी' चित्रपटातील जबरदस्त अभिनयामुळे अभिनेत्री अदा शर्मा चर्चेत आली. या चित्रपटासाठी अदाला अनेक पुरस्कारदेखील जाहीर झाले आहेत. अदा अभिनयासह आपल्या वैयक्तिक आयुष्यातील गोष्टीही चाहत्यांबरोबर शेअर करत असते. अनेकदा अदाने तिच्या नानीचा म्हणजेच आजीचा उल्लेख केला आहे. 'गुलाबी साडी' या मराठमोळ्या गाण्यावर नात अदा आणि तिच्या आजीचा व्हिडीओ प्रचंड व्हायरल झाला होता. अशातच अदाचा आजीशी कनेक्ट असणारा अजून एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. आज अदाने खास तिच्या आजीची साडी नेसली होती. आजीची साडी नेसायची अदाची ही काही पहिलीच वेळ नाही. पण, विशेष गोष्ट म्हणजे या साडीची किंमत फक्त १५ रुपये आहे असं ती म्हणाली.

सोनम ड्रेसमुळे झाली ट्रोल

सोनम कपूर ही फॅशन आयकॉन, फॅशन दिवा या नावांनी इंडस्ट्रीमध्ये प्रचलित आहे. अभिनयाबरोबरच ती आपल्या वेगवेगळ्या लूक्समुळे सतत चर्चेत असते. सोनमनं नुकतीच तिच्या बुक लॉचला हजेरी लावली होती. या लॉच सोहळ्याला सोनमने काळ्या रंगाचा ड्रेस घातला होता. तिच्या या लूकचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.सोनमच्या व्हायरल झालेल्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी कमेंट्स करीत तिला ट्रोल केलं आहे. एकानं कमेंट करीत लिहिलं, "दारा सिंगसारखी दिसतेय." तर, "ही नाईट ड्रेसवर का फिरतेय." असं दुसऱ्या नेटकऱ्यानं कमेंट करीत लिहिलं. "हिचा ड्रेसिंग सेन्स कुठे गेला", असंही एकानं विचारलं. "सोनमनं उशांची कव्हर्स घातली आहेत, असं वाटतंय. जर कोणती गोष्ट सध्या ट्रेंडमध्ये किंवा फॅशनमध्ये असली तरी ती प्रत्येकाला शोभून दिसेल असं नसतंबॉलीवूडमधली फ्लॉप अभिनेत्री" असं एका युजरने लिहिलं. "यापेक्षा वाईट ड्रेस मी आजपर्यंत बघितला नाही.", "चालता फिरता हँगर", "ती हँगरमधून ड्रेस काढायला विसरली" अशा प्रकारच्या ट्रोल्स करणाऱ्या कमेंट्स सोनम कपूरच्या व्हिडीओवर करण्यात आल्यात.

इंडस्ट्रीतला आऊटसायडर ते आम आदमीचा हिरो!

घरी चित्रपटाशी संबंधित कुणीही नाही, मूळ गाव मुंबानगरीपासून हजारो किलोमीटर दूर हिमाचल प्रदेशात, अल्फा मेल अर्थात पौरुष अवतारी प्रतिमा नाही, सिक्स पॅक ॲब्स नाहीत. चित्तथरारक स्टंट केल्यानंतर ललनांच्या गराड्यात वगैरेही नाही. हिंदी मालिका आणि टीव्ही सृष्टीच्या हिरोच्या पारंपरिक प्रतिमेला छेद देत पडद्यावर आम आदमी साकारुन त्यालाच नायकत्व देणाऱ्या विक्रांतचा आज वाढदिवस. टीव्ही मालिकांमध्ये काम करू लागल्यानंतर मंडळी तिथेच स्थिरावतात. पण विक्रांतने टीव्ही ते चित्रपट असं स्थित्यंतर केलं. सुरुवातीला पदरी पडलेल्या छोट्या भूमिका चोख निभावत विक्रांतने वाटचाल सुरू ठेवली. 12TH FAIL निमित्ताने विक्रांतला हिरो करणारी कहाणी पडद्यावर आली. चंबळसारख्या दुर्गम भागातून सुरुवात करून थेट प्रशासकीय अधिकारी झालेल्या मनोज शर्मा यांची कारकीर्द विक्रांतने सुरेख साकारली. याचा प्रत्यय चाहत्यांच्या प्रतिक्रिया, पुरस्कार आणि सोशल मीडियावर वाढते फॉलोअर्स यातून सिद्ध होताना दिसत आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने विक्रांतच्या सफरीचा घेतलेला धांडोळा.विक्रांतचं कुटुंब मूळचं हिमाचल प्रदेशमधील शिमल्याचं. त्याच्या वडिलांचं नाव जॉली आणि आईचं नाव आमना आहे. त्याला मोईन नावाचा मोठा भाऊ आहे. त्याच्या वडिलांचं कुटुंब ख्रिश्चन धर्म पाळतं, तर त्याच्या आईचं कुटुंब शीख आहे. विक्रांतच्या आई-बाबांनी पळून जाऊन लग्न केलं होतं, नंतर ते काही काळ विदर्भातील नागभीड इथं राहत होते.

दियाला गरोदरपणात झाला होता गंभीर आजार

दिया मिर्झा चार वर्षांपूर्वी एका मुलाची आई झाली. तिचा गर्भधारणेचा टप्पा सोपा नव्हता. प्रसूतीच्या वेळी तिला खूप समस्या आल्या. ती एका आठवड्यासाठी तिच्या मुलापासून दूर राहिली आणि स्वतः मृत्यूपासून थोडक्यात बचावली. अलीकडेच दियाने पहिल्यांदाच त्या टप्प्याबद्दल खुलासा केला आहे. दिया मिर्झाने २०२१ मध्ये वैभव रेखीबरोबर दुसरे लग्न केले. लग्नाच्या काही महिन्यांनंतर तिने मुलाला जन्म दिला. वयाच्या ३९ व्या वर्षी आई होणे दियासाठी वेदनादायक होते. तिच्या पोटात संसर्ग झाला होता, ज्यामुळे तिची अकाली प्रसूती झाली.परिस्थिती अशी होती की दिया मिर्झा स्वतः मृत्यूपासून थोडक्यात बचावली. पीपल ऑफ इंडियाशी बोलताना दिया म्हणाली, "मला बॅक्टेरियाचा संसर्ग झाला होता, जो माझ्या अपेंडिक्स शस्त्रक्रियेचा दुष्परिणाम असू शकतो. माझ्या गर्भधारणेच्या पाचव्या महिन्यात माझी शस्त्रक्रिया झाली. माझ्या सहाव्या महिन्याच्या अखेरीस आम्हाला जाणवले की, माझ्या प्लेसेंटामधून रक्तस्त्राव होत आहे आणि माझे शरीर सेप्सिसकडे जात आहे. जर बाळाचा जन्म झाला नसता तर आमच्या दोघांनाही वाचवता आले नसते, ते खूप भयानक होते."दीया मिर्झा मुलाखतीत पुढे म्हणाली की, जेव्हा ती रुग्णालयात गेली तेव्हा तिने स्पष्टपणे सांगितले होते की फक्त तिच्या मुलाला वाचवा. याबद्दल दिया म्हणाली, "त्यांना ४८ तासांनंतर कळले की माझ्या आत असलेले बॅक्टेरिया घातक आहेत. जन्मानंतर ३६ तासांनी अव्यानवर (मुलाचे नाव) जीवनरक्षक शस्त्रक्रिया करावी लागली. माझ्या मुलाच्या आतड्यात छिद्र होते आणि त्याची शस्त्रक्रिया झाली. मुळात आतडे शरीराबाहेर काढण्यात आले होते." दिया मिर्झा म्हणाली की, तिच्या मुलाच्या जन्मानंतर तिला आठवड्यातून फक्त दोनदाच त्याला भेटता येत होते. २० दिवसांनी मुलाला डिस्चार्ज देण्यात आला.

जितेशचा 'लगान' स्टाईल भन्नाट शॉट!

ज्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल

। नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

आयपीएल २०२५ स्पर्धेतील अंतिम सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्ज या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात पंजाब किंग्ज संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला २० षटकांअखेर ९ गडी बाद १९० धावांचा डोंगर उभारला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाकडून फलंदाजी करताना विराट कोहलीने सर्वाधिक ४३ धावांची खेळी केली. तर जितेश शर्माने २४ धावा चोपल्या. यादरम्यान जितेश शर्माने एक भन्नाट शॉट मारला. ज्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे..

अंतिम सामन्यात कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. हा निर्णय पंजाबच्या गोलंदाजांनी योग्य ठरवला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाकडून विराट कोहली आणि फिल सॉल्टची जोडी मैदानावर आली. या जोडीला हवी तशी सुरूवात करता आली नाही. पहिल्या षटकात फिल सॉल्टने १३ धावा चोपल्या. मात्र, त्यानंतर काइल जेनिसनने त्याला बाद करत माघारी धाडलं. सॉल्ट बाद झाल्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर मयांक अगरवाल फलंदाजीला आला. त्याने काही आकर्षक फटके मारले. २ चौकार आणि १ षटकाराच्या साहाय्याने २४ धावांची खेळी केली. तर कर्णधार रजत पाटीदारने २६ धावांची खेळी केली. लियाम लिव्हिंगस्टनने २५ धावांची खेळी केली.तर झाले असे की, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाची फलंदाजी सुरू असताना १७ वे षटक टाकण्यासाठी काईल जेमिसन गोलंदाजीला आला. त्यावेळी जितेश शर्मा स्ट्राईकवर होता. जेमिसनने पहिलाच चेंडू गुड लेन्थवर टाकला. या चेंडूवर जितेश शर्माने आगळा वेगळा शॉट मारला. त्याने लगान स्टाईल किपरच्या डोक्यावरून षटकार मारला. हा शॉट पाहून समालोचन करत असलेला एबी डिव्हिलियर्सही शॉक झाला. या षटकाराचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.या डावातील शेवटचे षटक टाकण्यासाठी अर्शदीप सिंग गोलंदाजीला आला. या षटकात त्याने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघातील ३ फलंदाजांना माघारी पाठवलं. आधी त्याने रोमारियो शेफर्डला बाद केलं. त्यानंतर कृणाल पांड्या आणि शेवटी भुवनेश्वर कुमारला बाद करत माघारी धाडलं.अंतिम सामन्यात कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. हा निर्णय पंजाबच्या गोलंदाजांनी योग्य ठरवला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाकडून विराट कोहली आणि फिल सॉल्टची जोडी मैदानावर आली. या जोडीला हवी तशी सुरूवात करता आली नाही. पहिल्या षटकात फिल सॉल्टने १३ धावा चोपल्या. मात्र, त्यानंतर काइल जेनिसनने त्याला बाद करत माघारी धाडलं. सॉल्ट बाद झाल्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर मयांक अगरवाल फलंदाजीला आला. त्याने काही आकर्षक फटके मारले. २ चौकार आणि १ षटकाराच्या साहाय्याने २४ धावांची खेळी केली. तर कर्णधार रजत पाटीदारने २६ धावांची खेळी केली. लियाम लिव्हिंगस्टनने २५ धावांची खेळी केली.तर झाले असे की, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाची फलंदाजी सुरू असताना १७ वे षटक टाकण्यासाठी काईल जेमिसन गोलंदाजीला आला. त्यावेळी जितेश शर्मा स्ट्राईकवर होता. जेमिसनने पहिलाच चेंडू गुड लेन्थवर टाकला. या चेंडूवर जितेश शर्माने आगळा वेगळा शॉट मारला. त्याने लगान स्टाईल किपरच्या डोक्यावरून षटकार मारला.

कोहलीने 43 धावांची खेळी केली

हा शॉट पाहून समालोचन करत असलेला एबी डिव्हिलियर्सही शॉक झाला. या षटकाराचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.या डावातील शेवटचे षटक टाकण्यासाठी अर्शदीप सिंग गोलंदाजीला आला. या षटकात त्याने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघातील ३ फलंदाजांना माघारी पाठवलं. आधी त्याने रोमारियो शेफर्डला बाद केलं. त्यानंतर कृणाल पांड्या आणि शेवटी भुवनेश्वर कुमारला बाद करत माघारी धाडलं.आयपीएल २०२५ स्पर्धेतील अंतिम सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्ज या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात पंजाब किंग्ज संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला २० षटकांअखेर ९ गडी बाद १९० धावांचा डोंगर उभारला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाकडून फलंदाजी करताना विराट कोहलीने सर्वाधिक ४३ धावांची खेळी केली.

अय्यरमुळे शुबमन गिलवर दबाव येतोय

इंग्लंड दौऱ्याआधी सुनील गावसकरांचा मोठा आरोप

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

आयपीएल २०२५ स्पर्धा झाल्यानंतर भारतीय संघ इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे. २० जूनपासून सुरू होणाऱ्या या दौऱ्यावर भारतीय संघ ५ कसोटी सामन्यांची मालिका खेळणार आहे. या दौऱ्यासाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. रोहित शर्मानंतर कर्णधारपदाची जबाबदारी शुबमन गिलकडे सोपवण्यात आली आहे.

दरम्यान आयपीएल २०२५ स्पर्धेत दमदार कामगिरी करून पंजाब किंग्ज संघाला अंतिम फेरीत पोहोचवणाऱ्या श्रेयस अय्यरला भारतीय संघाचा कर्णधार बनवण्याची मागणी केली जात आहे. याबाबत माजी भारतीय क्रिकेटपटू सुनील गावसकर यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. युवा फलंदाज शुबमन गिलकडे भारतीय कसोटी संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. बीसीसीआयने घेतलेल्या या निर्णयाचं अनेकांनी समर्थन केलं आहे. तर काहींनी विरोधही केला आहे.

सुनील गावसकर यांनी स्पोर्ट्स तक वर बोलताना म्हटले की, " शुबमन गिल हा कर्णधारपदासाठी योग्य आहे की नाही, हे पाहण्यासाठी त्याला आपल्याला संधी द्यावी लागेल. आपण अशा चर्चा करून त्याच्यावर दबाव टाकतोय. इंग्लंड दौऱ्याआधी त्याच्यावर दबाव टाकण्याची काहीच गरज नाही. श्रेयस अय्यरला संघात स्थान मिळालेलं नाही. त्यामुळे त्याला कर्णधारपद मिळण्याबाबत कुठलीही चर्चा व्हायला नको ."श्रेयस अय्यरने गेल्या काही वर्षात आयपीएल स्पर्धेत कर्णधार म्हणून दमदार कामगिरी केली आहे. श्रेयस अय्यर हा आयपीएल स्पर्धेत ३ वेगवेगळ्या संघांना अंतिम फेरीत पोहोचवणारा पहिलाच कर्णधार आहे. याआधी कुठल्याही कर्णधाराला अशी कामगिरी करता आलेली नाही. फेरीत पोहोचवलं होतं. त्यानंतर गेल्या हंगामात कोलकाता नाईट रायडर्स संघाला अंतिम फेरीत पोहोचवलं आणि ट्रॉफी जिंकूनही दिली होती. या हंगामात त्याने पंजाब किंग्ज संघाला अंतिम फेरीत पोहोचवलं. अंतिम फेरीत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला पराभूत करून श्रेयस अय्यरकडे मोठा रेकॉर्ड करण्याची संधी असणार आहे. सलग २ वर्षांत २ संघांना आयपीएलची ट्रॉफी जिंकून देणारा तो पहिलाच कर्णधार ठरू शकतो.शुबमन गिल (कर्णधार) यशस्वी जैस्वाल, ऋषभ पंत (यष्टीरक्षक/ उपकर्णधार), केएल राहुल, साई सुदर्शन, अभिमन्यू ईश्वरन, करुण नायर, नितीश कुमार रेड्डी, रविंद्र जडेजा, ध्रुव जुरेल, वॉशिंग्टन सुंदर, शार्दुल ठाकूर, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, अर्शदिप सिंग, आकाश दीप, कुलदीप यादव

कर्णधारपदाची जबाबदारी

आयपीएल २०२५ स्पर्धेत दमदार कामगिरी करून पंजाब किंग्ज संघाला अंतिम फेरीत पोहोचवणाऱ्या श्रेयस अय्यरला भारतीय संघाचा कर्णधार बनवण्याची मागणी केली जात आहे.युवा फलंदाज शुबमन गिलकडे भारतीय कसोटी संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। बुधवार ।
। दि. 4 जून 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

30 हून अधिक कंपन्यांचा सहभाग

डॉ. डी. वाय. पाटील कॅम्पसच्या विद्यार्थ्यांना "ऑन द जॉब ट्रेनिंग" !

1600 हून अधिक इच्छुक उमेदवारांची नोंदणी

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मास्टर्स ऑफ कम्प्युटर एप्लीकेशन अँड मॅनेजमेंटतर्फे कार्यानुभव व ऑन द जॉब ट्रेनिंग मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मास्टर ऑफ कंम्पुटर एप्लीकेशन्स अँड मॅनेजमेंट आकुर्डी यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व तंत्रज्ञान भागीदार टॅलेंलिओ (TALENLIO) यांच्या सहकार्याने एमबीए व एमसीए विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिप आणि प्लेसमेंटसाठी "कार्यानुभव व ऑन द जॉब ट्रेनिंग" (JOB FAIR 2025) मेळाव्याचे आयोजन आकुर्डी कॅम्पस मध्ये केले होते.

या कार्यक्रमात एकूण ३० हून अधिक कंपन्यांना आमंत्रित करण्यात आले होते. १६०० हून अधिक इच्छुक उमेदवारांनी नोंदणी केली. ही संधी विद्यार्थ्यांना त्यांच्या कारकिर्दीची दिशा ठरवण्यासाठी आणि विविध क्षेत्रातील संभाव्य नियोक्त्यांशी थेट संवाद साधण्यासाठी एक उत्कृष्ट व्यासपीठ ठरली. डॉ. के. निर्मला - संचालक, प्रा. जस्मिता कौर - डीन (प्लेसमेंट), तसेच प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी व DYPIMCAM च्या संपूर्ण कार्यसमितीने JOB FAIR 2025 यशस्वीरीत्या यजमान म्हणून पार पाडले.

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education

EDUCATING MIND & HEART

ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26

Holistic
Empowering
Learning

IT ALL STARTS HERE

42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION

55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS

11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA

17k+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES

600+
TEACHING AND NON TEACHING STAFF

13k+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE

PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA

+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org

BLOSSOM YOUR KNOWLEDGE

Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE

ADMISSIONS OPEN

2025-26

PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY

For more info

95277 64646 / 77967 67292

Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's

SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE

Powered by JAI HIND EDUTECH

CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012

BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)



ADMISSION OPEN 2025-2026

Pre Primary to Class XII

LIMITED SEATS
Hurry up!!!

Bi-focal / Technical / Vocational Subject are available

For Science Stream

- Computer Science
- Crop Science
- Electronics
- Mechanical / Technical Automobile
- Information Technology (IT)

For Commerce Stream

- Banking
- Marketing & Sales
- Office Management
- Small Industries & Self employment
- Information Technology (IT)

CALL NOW : 9763441639 / 8657473241